सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

जिल्हा व सत्र न्यायालय, नंदुरबार

# नागरिकांची सनद

सन २०२४

दिनांक ०२ मे,२०२४

जिल्हा व सत्र न्यायालय, नंदुरबार
हे कार्यालय विधी व न्याय विभागांतर्गत येते. या कार्यालयाचे प्रारुप खालील प्रमाणे आहे.
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, नंदुरबार
(विभाग प्रमुख )

| नंदुरबार | शहादा | तळोदा | नवापूर | अक्कलकुवा | धडगांव |
|---|---|---|---|---|---|
| जिल्हा न्यायाधीश-१ व अतिरिक्त सत्र न्यायाधीश, नंदुरबार | जिल्हा न्यायाधीश-१ व अतिरिक्त सत्र न्यायाधीश, शहादा | दिवाणी न्यायाधीश, क. स्तर व न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग, तळोदा | दिवाणी न्यायाधीश, क.स्तर व न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग, नवापूर | दिवाणी न्यायाधीश, क. स्तर व न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग, अक्कलकुवा | दिवाणी न्यायाधीश, क. स्तर व न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, धडगांव |
| जिल्हा न्यायाधीश-२ व अतिरिक्त सत्र न्यायाधीश, नंदुरबार | तदर्थ जिल्हा न्यायाधीश-१ व अतिरिक्त सत्र न्यायाधीश, शहादा | | सहदिवाणी न्यायाधीश, क. स्तर व न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग, नवापूर | सहदिवाणी न्यायाधीश, क. स्तर व न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग, अक्कलकुवा | |
| दिवाणी न्यायाधीश व.स्तर, नंदुरबार | दिवाणी न्यायाधीश व.स्तर, शहादा | | | | |
| मुख्य न्यायदंडाधिकारी, नंदुरबार | सहदिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर व अति.मुख्य न्यायदंडाधिकारी, शहादा. | | | | |
| सहदिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर व अति.मुख्य न्यायदंडाधिकारी, नंदुरबार. | सहदिवाणी न्यायाधीश, क.स्तर व न्यायदंडाधिकारी, प्र.वर्ग., शहादा | | | | |
| २रे सहदिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर व अति.मुख्य न्यायदंडाधिकारी, नंदुरबार. | २रे सहदिवाणी न्यायाधीश, क.स्तर व न्यायदंडाधिकारी, प्र.वर्ग., शहादा | | | | |
| सहदिवाणी न्यायाधीश, क.स्तर व न्यायदंडाधिकारी, प्र.वर्ग., नंदुरबार | ३रे सहदिवाणी न्यायाधीश, क.स्तर व न्यायदंडाधिकारी, प्र.वर्ग., शहादा | | | | |
| २रे सहदिवाणी न्यायाधीश, क.स्तर व न्यायदंडाधिकारी, प्र.वर्ग., नंदुरबार | | | | | |
| ३रे सहदिवाणी न्यायाधीश, क.स्तर व न्यायदंडाधिकारी, प्र.वर्ग., नंदुरबार | | | | | |

| नंदुरबार | शहादा | तळोदा | नवापूर | अक्कलकुवा | धडगांव |
|---|---|---|---|---|---|
| ४थे सहदिवाणी न्यायाधीश, क.स्तर व न्यायदंडाधिकारी, प्र.वर्ग., नंदुरबार | | | | | |

वरील सर्व न्यायालये हे दिवाणी प्रक्रिया संहिता, फौजदारी प्रक्रीया संहिता व इतर कायदे तसेच मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी ठरवुन दिलेल्या दिवाणी नियमावली व फौजदारी नियमावली नुसार त्यांच्या न्यायालयास असलेल्या महसुली अधिकार क्षेत्रानुसार न्यायदानाचे काम करतात.

दिवाणी व फौजदारी न्यायालयात खालील प्रकरणे दाखल होतात -

प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, नंदुरबार यांना जिल्हा न्यायालयांतर्गत जिल्हा व तालुकास्तरावर कार्यरत न्यायालयांचे कामकाजावर देखरेख करण्याबाबत प्रशासकीय अधिकार आहेत.

**प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, जिल्हा न्यायाधीश -१/२ व अतिरिक्त सत्र न्यायाधीश आणि तदर्थ जिल्हा न्यायाधीश-१ व अतिरिक्त सत्र न्यायाधीश यांचे न्यायालयात खालील प्रमाणे प्रकरणे दाखल होतात.**

दिवाणी स्वरुपाची प्रकरणे - मुल्य मर्यादिनुसार अधिकार असलेल्या प्रकरणांमधील दिवाणी न्यायाधीश व.स्तर, दिवाणी न्यायाधीश क.स्तर यांचा निकाल व हुकूमनाम्याचे विरुध्दची अपिलांची प्रकरणे ही दाखल होतात व ते नियमानुसार निकाली काढण्यात येतात. तसेच मोटार अपघात नुकसान भरपाई अंतर्गत येणारी प्रकरणे, लवाद व समेट अधिनियम अंतर्गत येणारी प्रकरणे, विशेष विवाह कायद्यांतर्गत येणारी प्रकरणे, गार्डीयन अॅण्ड वार्ड कायद्यांतर्गत येणारी प्रकरणे, तसेच बॉम्बे पब्लीक ट्रस्ट कलम ७२ अंतर्गत येणारी प्रकरणे, भू संपादन कायद्यांतर्गत येणारी प्रकरणे ही दाखल होतात व ते नियमानुसार निकाली काढण्यात येतात.

प्रशासकीय कारणांवरुन जिल्हयातील कोणत्याही न्यायालयातुन दिवाणी स्वरुपाची प्रकरणे आवश्यक त्या न्यायालयात वर्ग करण्याचे अधिकार तसेच दत्तक विधान संबंधी प्रकरणे चालविण्याचे अधिकार प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश यांना आहेत.

जिल्हा न्यायाधीश यांना रक्कम रुपये एक कोटी मुल्य मर्यादिपर्यंत अपील निकाली काढण्याचे अधिकार आहेत. जिल्हा न्यायाधीश-१ यांना रक्कम रुपये एक कोटी चे पुढील व्यावसायीक प्रकरणे दाखल करुन घेण्याचे व ते नियमानुसार निकाली काढण्याचे अधिकार आहेत. तसेच त्यांचेकडे व्यावसायीक प्रकरणांचे दिवाणी न्यायाधीश, व.स्तर यांचेकडील निकाली प्रकरणांचे अपीलांची प्रकरणे दाखल होतात व ते नियमानुसार निकाली काढण्यात येतात.

फौजदारी स्वरुपाची प्रकरणे - जसे न्यायदंडाधिका-याने गुन्हयाची दाखल होवुन ती प्रकरणे सत्र न्यायालयाकडे वर्ग केल्यानंतर सदर सत्र खटले नियमानुसार पुरावा नोंदविल्या नंतर निकाली काढण्यात येतात. न्यायदंडाधिका-यांनी फौजदारी प्रकरणांत दिलेल्या शिक्षेबाबत व इतर न्यायनिर्णयाविरुध्द आवाहन केलेले अपील आणि पुर्नविलोकनाची प्रकरणे ही दाखल होतात व ती नियमाप्रमाणे निकाली काढण्यात येतात.

लैंगिक अत्याचारापासून बालकांचे संरक्षण अधिनियमांतर्गत येणारी प्रकरणे, एन.डी.पी.एस. अधिनियमाखाली येणारी प्रकरणे, महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी कायद्यांतर्गत येणारी प्रकरणे, भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियमांतर्गत येणारी प्रकरणे,. विद्युत अधिनियम २००३ अंतर्गत येणारी प्रकरणे, अनुसूचित जाती , जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यांतर्गत येणारी प्रकरणे ही दाखल होतात व या सर्व प्रकरणात पुरावा नोंदवुन ती नियमानुसार निकाली काढण्यात येतात.

प्रशासकीय कारणांवरुन जिल्हयातील कोणत्याही न्यायालयातून फौजदारी स्वरुपाची प्रकरणे आवश्यक त्या न्यायालयात वर्ग करण्याचे अधिकार प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश यांना आहेत.

<u>मुख्य न्यायदंडाधिकारी यांचे न्यायालयात खालील प्रमाणे प्रकरणे दाखल होतात.</u>

<u>फौजदारी स्वरुपाची प्रकरणे</u> - फौजदारी प्रक्रीया संहिता अंतर्गत येणारी प्रकरणे, औषध व सौदर्यप्रसाधने कायदा अंतर्गत येणारी प्रकरणे, अन्न व भेसळ कायद्यांतर्गत येणारी प्रकरणे, सरकारी कर्मचारी यांनी केलेल्या आर्थिक अफरातफरीची प्रकरणे ही दाखल होतात व या सर्व प्रकरणात पुरावा नोंदवुन ती नियमानुसार निकाली काढण्यात येतात.

<u>दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर यांचे न्यायालयात खालील प्रमाणे प्रकरणे दाखल होतात.</u>

<u>दिवाणी स्वरुपाची प्रकरणे</u> - दिवाणी प्रक्रिया संहितेनुसार आर्थिक मुल्य रुपये पाच लाख च्या वरचे सर्व दिवाणी प्रकरणे , शासनाचे विरोधात असलेली व शासनाने दाखल करावयाची दिवाणी प्रकरणे, हिंदू विवाह कायद्यांतर्गत येणारी प्रकरणे, कामगार नुकसान भरपाई कायद्यांतर्गत दाखल होणारी प्रकरणे, भारतीय उत्तराधिकार अधिनियम १९२५ अन्वये सदर न्यायालयाच्या अधिकार क्षेत्रात येणारे वारसपत्र ही प्रकरणे दाखल होतात व पुरावा नोंदवुन ती नियमानुसार निकाली काढण्यात येतात. भारतीय उत्तराधिकार अधिनियम १९२५ आणि बॉम्बे विनियम VII सन १८२७ अन्वये सदर न्यायालयाच्या अधिकार क्षेत्रात येणारी वारसपत्र मिळण्याचे अर्ज ज्यात हरकत घेण्यात आलेली आहे अशी प्रकरणे नियमानुसार निकाली काढण्यात येतात.

दिवाणी न्यायाधीश, व.स्तर यांना रक्कम रुपये एक कोटी चे आतील व्यावसायीक प्रकरणे दाखल करुन घेण्याचे व ते नियमानुसार निकाली काढण्याचे अधिकार आहेत.

<u>दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग यांचे न्यायालयात खालील प्रमाणे प्रकरणे दाखल होतात.</u>

<u>दिवाणी स्वरुपाची प्रकरणे</u> - दिवाणी प्रक्रिया संहितेनुसार आर्थिक मुल्य रुपये पाच लाख च्या आतील सर्व दिवाणी प्रकरणे, भारतीय उत्तराधिकार अधिनियम १९२५ आणि बॉम्बे विनियम VII सन १८२७ अन्वये सदर न्यायालयाच्या अधिकार क्षेत्रात येणारी वारसपत्र मिळण्याचे अर्ज ज्यात हरकत घेण्यात आलेली नाही अशी प्रकरणे दाखल होतात व नियमाप्रमाणे निकाली काढण्यात येतात.

<u>फौजदारी स्वरुपाची प्रकरणे</u> - फौजदारी प्रक्रिया संहिते अंतर्गत येणारी प्रकरणे, जिवनावश्यक वस्तू कायदा अंतर्गत येणारी प्रकरणे, परक्राम्य संलेख अधिनियम कलम १३८ अंतर्गत येणारी प्रमकरणे, कौटुंबीक हिंसाचार प्रतिबंधक कायदा अंतर्गत येणारी प्रकरणे, वन्यजीव प्राणी कायदा अंतर्गत येणारी प्रकरणे, जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम अंतर्गत येणारी प्रकरणे, गर्भलिंग निदान प्रतिबंध कायदा अंतर्गत येणारी प्रकरणे, मुंबई दारुबंदी कायदा अंतर्गत येणारी प्रकरणे, मुंबई जुगार कायदा अंतर्गत येणारी प्रकरणे, मुंबई पोलीस कायदा अंतर्गत येणारी प्रकरणे, मोटारवाहन कायदा अंतर्गत येणारी प्रकरणे, मुंबई ग्रामपंचायत कायदा अंतर्गत येणारी

प्रकरणे, नगरपालीका अधिनियम या अंतर्गत येणारी प्रकरणे, वजन व मापे कायदा अंतर्गत येणारी प्रकरणे व न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग यांना चालविण्याचे अधिकारी असलेले फौजदारी स्वरुपाची प्रकरणे या न्यायालयात दाखल होतात व या सर्व प्रकरणात पुरावा नोंदवुन ती नियमानुसार निकाली काढण्यात येतात.

मुख्य न्यायदंडाधिकारी यांचे न्यायालय सोडून इतर सर्व न्यायालयांना दिवाणी स्वरुपाची प्रकरणे चालविण्याचा अधिकारी आहे.

प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, नंदुरबार

# <u>नागरीकांची सनद</u>

विवरणपत्र १

या कार्यालयाकडून पक्षकारांना खालीलप्रमाणे सुविधा सेवा दिल्या जातात.

| अ.क्र. | कार्यालयाचे नांव | जनतेस देण्यात येणा-या सेवा (स्तर नमुद करावा) | त्यासाठी कोणकोणत्या कागदपत्रांची आवश्यकता आहे | सेवा देणारे अधिकारी (सेवानिहाय प्राधिकाराचे नांव नमुद करावे) | सेवा पुरविण्यास लागणारा कालावधी (निर्धारीत असल्यास विहित/सर्वसाधारण) | अपील असल्यास अपिलीय प्राधिकारी आणि अपील करण्याचा विहित कालावधी | सेवा पुरविल्या न गेल्यास तक्रार (असल्यास) ती कोणाकडे करावयाची (पदनाम व पत्ता ) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | जिल्हा व सत्र न्यायालय, नंदुरबार | १. जनतेकडून माहितीचा अधिकार अधिनियमांतर्गत आलेल्या अर्जांना उत्तरे | महाराष्ट्र जिल्हा न्यायालय माहितीचा अधिकार (सुधारीत नियम) २००९ यात दिल्याप्रमाणे नियम ४ नुसार ज्या व्यक्तीस माहिती अधिकारांतर्गत माहिती पाहिजे त्यांनी जोडपत्र अ या विहित नमुन्यात अर्ज करावा व त्याखाली स्वतः स्वाक्षरी करावी आणि अर्जास रु. १०/- चा न्यायालय फी मुद्रांक चिकटवावा. अर्जदार हा जर दारिद्र्य रेषेखालील असल्यास त्यास न्यायालय फी मुद्रांक देण्याची आवश्यकता नाही. परंतु त्याला अर्जासोबत तो दारिद्र्य रेषेखालील असल्याबाबतचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे. अर्जदारास माहिती पोष्टाव्दारे पाहिजे असल्यास त्याने अर्जासोबत रजिष्टर पोष्टाचे पाकीट ज्यावर त्याचे नांव व पत्ता लिहून जोडणे आवश्यक आहे. | श्री. डी.पी. सैदांणे, प्रभारी प्रबंधक तथा जनमाहिती अधिकारी जिल्हा न्यायालय, नंदुरबार | माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याच्या दिनांका पासून ३० दिवस. सहायक अधिका-याकडे परस्पर अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांकापासून ३५ दिवस. | ----- | प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, नंदुरबार |
| | | २. जनतेकडून माहितीचा अधिकारी अधिनियमांतर्गत आलेल्या अपीलांना उत्तरे | माहिती अधिकारांतर्गत विहित केलेल्या जोडपत्र ब या विहित नमुन्यामध्ये अर्ज करावा. अर्जास रु. २०/- चा न्यायालय फी मुद्रांक चिकटवावा. अर्जदार हा जर दारिद्र्य रेषेखालील असल्यास त्यास न्यायालय फी मुद्रांक देण्याची आवश्यकता नाही. परंतु त्याला अर्जासोबत तो दारिद्र्य रेषेखालील असल्याबाबतचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे. | श्री.आर.जी.मलशेट्टी, जिल्हा न्यायाधीश-१ तथा अपिलीय अधिकारी, नंदुरबार | अपिलीय प्राधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याच्या दिनांका-पासून ३०दिवस | अपिलीय अधिका-याकडे अपील अर्ज प्राप्त झाल्याच्या दिनांका पासून ३० दिवस. उत्तर मिळाल्या पासून ९० दिवसात राज्य माहिती आयुक्त, | |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | नाशिक यांचेकडे | |
| २ | जिल्हा व सत्र न्यायालय, नंदुरबार व इतर न्यायालये | पक्षकाराकडून प्राप्त नकलेच्या अर्जाप्रमाणे न्यायीक प्रकरणांतील दाखल दस्त, साक्षीपुरावे, न्यायनिर्णय इत्यादींच्या नकला पुरविणे. | नक्कल विभागात विहित नमुन्यात प्रमाणित नकला मिळण्याकरीता अर्ज करावा लागतो. साधी नक्कल मिळणेसाठीच्या अर्जास रु. ५/- चे न्यायलय फी मुद्रांक चिकटवावे लागते. तसेच तात्काळ नक्कल मिळणेसाठीच्या अर्जास रु. १०/- चे न्यायलय फी मुद्रांक चिकटवावे लागते. | सहायक अधिक्षक नक्कल विभाग | दिवाणी नियमावली व फौजदारी नियमावली यातील तरतुदींनुसार नक्कल विभागास अभिलेख प्राप्त झाल्यापासून साधी नक्कल १० दिवस. तात्काळ नक्कल ४८ तास. | -- | संबंधित कार्यालय प्रमुखाकडे |
| ३ | जिल्हा व सत्र न्यायालय, नंदुरबार व इतर न्यायालये | वकील व पक्षकार यांना त्यांच्या प्रकरणातील विविध टप्प्यांवर एस.एम.एस. संदेश<br><br>वकील व पक्षकार यांना ईमेल व्दारे आदेश/न्यायनिवाडे पाठविणे.<br><br>ई कोर्टस् सर्वीसेसवर प्रकरणांची ऑनलाईन माहिती उपलब्ध<br><br>वकील व पक्षकार यांना त्यांच्या प्रकरणांची ई सुविधा केंद्रामध्ये माहिती दिली जाते. | एस.एम.एस. व ई मेल व्दारे माहिती मिळण्यास्तव वकील तथा पक्षकार यांनी त्यांचा ई मेल आयडी तथा मोबाईल क्रमांक सीआयएस प्रणालीमध्ये प्रविष्ट करणे आवश्यक आहे. | ---- | प्रकरणात होणारे आदेश / न्यायनिवाडे दुस-या दिवशी ई मेलव्दारे प्राप्त होतात.<br><br>एस.एम.एस. प्रकरणाचे कामकाज आटोपल्यानंतर त्याच दिवशी दुपारी किंवा सायंकाळी | ---- | प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, नंदुरबार |

जिल्हा व सत्र न्यायालय, नंदुरबार.
दि.०२/०५/२०२४.

(आशुतोष नि. करमरकर )
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, नंदुरबार.

म.जा.क्र. 389/2024

# जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, नंदुरबार

नागरिकांची सनद

विवरणपत्र - 2

| अ. क्र. | कार्यालयाचे नाव | जनतेस देण्यात येणाऱ्या सेवा (स्तर नमूद करावा) | त्यासाठी कोणकोणत्या कागदपत्राची आवश्यकता आहे. | सेवा देणारे अधिकारी (सेवा निहाय प्राधिकरणाचे नाव नमुद करावे | सेवा पुरविण्यास लागणारा कालावधी(निर्धारीत असल्यास विहित सर्वसाधारपणे) | अपील असल्यास अपीलीय अधिकारी आणि अपील करण्याचा विहीत कालावधी | सेवा पुरविल्या न गेल्यास तक्रार असल्यास ती कोणाकडे करावयाची (पदनाम व पत्ता) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, नंदुरबार | 1. मोफत विधी तज्ञ तसेच जनतेला कायदयाच्या संदर्भात मोफत माहिती दिली जाते.<br>2. न्यायालयीन प्रकरणांबाबत मोफत विधी सहाय्य दिले जाते.<br>3. सरकारी खर्चाने वकिलांची नेमणुक<br>4. महिला/अनु.जाती व जमातीचे लोकांना मोफत विधी सहायता<br>5. कारागृहातील बंदी/कैदयांना मोफत सहाय्य व सल्ला देण्याकरिता विधी सहाय्य समुपदेशकांची नियुक्ती | तलाठी किंवा तहसिलदार यांचा रू. 3,00,000/- चे आत उत्पन्न असल्याचा दाखला | सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, नंदुरबार | त्वरीत | -- | मा. अध्यक्ष, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण तथा, प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश सो., नंदुरबार. |
| 2 | जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, नंदुरबार | मनोधैर्य योजनेअंतर्गत पिडीतांना आर्थिक मदत | 1. एफ.आय.आर प्रत<br>2. सी.आर.पी.सी.क्र., 164 जा जबाब<br>3. वैद्यकीय प्रमाणपत्र | | | | |
| 3 | जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, नंदुरबार | गावोगांवी जावुन विधी साक्षरता शिबीराचे माध्यमातुन कायदयाची माहिती उपलब्ध करून देणे व कायद्याबात जनजागृती करणे. | | | | | |
| 4 | जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, नंदुरबार | विविदाचा समेटाने समझोता करण्यासाठी सर्व जिल्हयामध्ये लोकअदालत व मध्यस्थता केंद्राची उपलब्धता व आयोजन करणे. | | | | | |

2.5.2024

Secretary
District Legal Services Authority
Nandurbar